بِسۡمِ اللّٰہِ الرَّحۡمٰنِ الرَّحِیۡمِ نَحۡمَدُہٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِہِ الۡکَرِیۡمِ وَعَلٰی عَبۡدِہِ الۡمَسِیۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰہِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in
محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# ओहद युद्धदरम्यान झालेल्या प्रसंगांचा उल्लेख तसेच पॅलेस्टीनच्या अत्याचारग्रस्तांसाठी प्रार्थनांचे आवाहन

सारांश प्रवचन हजरत मिर्जा मसरूर अहमद मसीहाचे पंचम खलीफा दि. ८-१२-२०२३ स्थान मशिद मुबारक,

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُولُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ ۙ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहानंतर हुजूर अनवर म्हणाले:

मागच्या प्रवचनात उहूदच्या युद्धाचा उल्लेख होता. या संदर्भात हजरत मुसलेह माऊद (रा.) यांनी जे सांगितले आहे ते मी थोडक्यात सांगेन. ते म्हणाले की, बद्रच्या युद्धानंतर काफिरांच्या सैन्याने बद्रच्या मैदानातून पळ काढताना घोषणा केली की पुढच्या वर्षी आम्ही पुन्हा मदिनेवर हल्ला करू आणि मुस्लिमांकडून आमच्या पराभवाचा बदला घेऊ. आणि एक वर्षानंतर त्यांनी पुन्हा मदीनावर हल्ला केला. मक्केतील लोकांचा राग इतका होता की बद्रच्या युद्धानंतर, त्यांनी घोषित केले होते की त्यांच्या मृतांवर कोणालाही रडण्याची परवानगी नाही आणि पुढील युद्धासाठी व्यापारी काफिल्यांचे आगमन राखून ठेवले जाईल. त्यामुळे मोठ्या तयारीनंतर तीन हजारांहून अधिक सैनिकांच्या फौजेने अबू सुफयानच्या नेतृत्वाखाली मदिनेवर हल्ला केला.

पवित्र प्रेषित (स.) यांनी आपल्या साथीदारांशी सल्लामसलत केली की आपण शहरात राहून लढावे की बाहेर जावून लढावे. पवित्र प्रेषिताची स्वतःची कल्पना अशी होती की शत्रूला आक्रमण करण्यास परवानगी द्यावी जेणेकरून ते युद्धाच्या सुरुवातीस जबाबदार असतील आणि मुस्लिम त्यांच्या घरात बसून लढू शकतील. परंतु ते तरुण मुस्लिम जे बद्रच्या युद्धात सामील होऊ शकले नाहीत आणि ज्यांच्या हृदयात ईश्वराच्या मार्गात शहीद होण्याची तळमळ होती. त्यांनह मदिनाबाहेर जाऊन लढण्याची इच्छा स्पष्ट केली. या प्रसंगी, पवित्र प्रेषित साहेबांनी एक स्वप्न देखील सांगितले ज्यानुसार त्यांनी काही गायी पाहिल्या, ज्यांची कत्तल केली जात होती. त्याचप्रमाणे त्यांच्या तलवारीचे टोक तुटलेले

आहे. त्यानंतर त्यांनी सुरक्षित आणि मजबूत चिलखताच्या आत हात ठेवल्याचे दृश्य पाहिले.आणि मेंढ्याच्या पाठीवर स्वार असल्याचेही त्यांनी पाहिले. साथीदारांच्या चौकशीवर, पवित्र प्रेषित (स.) यांनी या दृश्यांचा अर्थ सांगितला आणि म्हणाले की गार्यींच्या कत्तलीचा अर्थ असा आहे की माझे काही साथीदार या युद्धात शहीद होतील. तलवारीचा टोक तुटल्याचा अर्थ एखादा निकटतम व्यक्ति मरण पावतील किंवा कदाचित मला या मोहिमेत त्रास होईल. आरमारात हात घालण्याचा अर्थ असा आहे की आमचे मदिनेत राहणे अधिक योग्य आहे. मेंढ्यावर स्वार होण्याचा अर्थ असा की आम्ही काफिरांच्या सैन्यावर मात करू. जरी या स्वप्नात मुस्लिमांना हे स्पष्ट केले गेले की त्यांच्यासाठी मदिनामध्ये राहणे चांगले आहे, परंतु स्वप्नाचा अन्वयार्थ पवित्र पैगंबरांचा होता आणि कोणताही साक्षात्कार याविषयी झालेला नसल्यामुळे त्यांनी बहुसंख्यांचे मत मान्य केले आणि लढाईसाठी बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

जेव्हा बाहेर जाऊन लढायचे ठरले तेव्हा पवित्र प्रेषित (स.) यांनी साथीदारांना तयार होण्याचे आदेश दिले आणि ते स्वतः लढाईची तयारी करू लागले. पवित्र प्रेषित (स.) यांना बाहेर जाऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध लढण्यास भाग पाडले गेले असे हजरत सआद बिन मआज आणि हजरत उसैद बिन हुजैर लोकांना म्हणाले. म्हणून आता निर्णय घेण्याचा अधिकार पवित्र पैगंबरलाच बहाल करा ते जे निर्णय घ्याल तोच आमच्यासाठी चांगला असेल. ते बाहेर आला तेव्हा त्यांनी युद्धाचा पोशाख घातला होता. जेव्हा लोकांनी आपली विनवणी पवित्र प्रेषितांच्या सेवेत मांडली तेव्हा पवित्र प्रेषित म्हणाले की अल्लाहने आदेश दिला आहे की त्याच्या आणि त्याच्या शत्रूंमध्ये निर्णय घेईपर्यंत शस्त्रे घातल्यानंतर खाली उतरवू नये.

पवित्र प्रेषित (स.) यांनी साथीदारांसोबत निघताना तीन भाले लावले आणि त्यांच्यावर तीन ध्वज बांधले. औस वंशाचा ध्वज उसैद बिन हुजैरला, खजरज वंशाचा ध्वज अहबाब बिन मुंझरला आणि मुहाजिरीनचा ध्वज हजरत अलीला देण्यात आला. मदीनामध्ये राहिलेल्या लोकांसाठी नमाज चा इमाम, त्यांनी इब्ने उम्म मकतूमला आपला प्रभारी म्हणून नियुक्त केले. मुस्लिम सैन्यात दोन घोडे आणि शंभर चिलखत होते.

वाटेत, ज्यूंचा एक गट मुस्लिमांच्या वतीने लढाईत भाग घेण्यासाठी आला, म्हणून पवित्र पैगंबर (स.) यांनी काफिरांच्या विरोधात ज्यूंची मदत घेण्यास नकार दिला आणि त्यांना युद्धात भाग घेण्यापासून रोखले. त्याच प्रकारे, पवित्र प्रेषित (स.) यांनी पंधरा वर्षाखालील मुलांना युद्धात भाग घेण्यास मनाई केली आणि त्यांना परत पाठवले.

जेव्हा इस्लामिक सैन्य रात्री मुक्काम करत होते, तेव्हा पवित्र प्रेषित (स.) यांनी मुहम्मद बिन मुस्लिमाच्या नेतृत्वाखाली पन्नास सैनिकांची नियुक्ती केली, ज्यांनी रात्रभर इस्लामी सैन्याचे रक्षण केले.

आधी अब्दुल्लाह बिन अबी बिन सलुल त्याच्याबरोबर आला होता, पण तो वाटेने परत गेला होता. वर्णनात असे लिहिले आहे की, सहरच्या वेळी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) शेखांचे स्थानापुढे निघाले. आणि मदीना आणि उहुद यांच्या दरम्यान, शवत नावाच्या स्थानापर्यंत त्या ठिकाणी पोहोचल्यानंतर नमाजाची वेळ झाली आणि त्याने त्या ठिकाणी फजरची नमाज अदा केली. शवत हे वादी कुनाह आणि मदिना दरम्यानचे ठिकाण आहे. त्या ठिकाणी अब्दुल्ला बिन अबी बिन सलुल आपल्या सहकारी दांभिकांसह पैगंबराची बाजू सोडून परत आले. परत येताना अब्दुल्लाह बिन अबी म्हणाला की तुम्ही माझे ऐकले नाही आणि लहान तरूणांचे म्हणणे ऐकून घेतले मग आम्ही जीव का द्यायचा? अब्दुल्लाह बिन अबी बरोबर ढोंगी लोक परत आल्यानंतर, पवित्र प्रेषित (स.) सोबतच्या साथीदारांची संख्या सातशे झाली. या वेळी अन्सार म्हणाले हुजूर (स.) मदिनेमध्ये जे यहूदी आमचे मित्र आहेत आम्ही त्यांच्याकडून मदत घेऊ या. पवित्र प्रेषित (स.) म्हणाले की आम्हाला त्यांच्या मदतीची गरज नाही.

सकाळच्या प्रार्थनेनंतर, पवित्र पैगंबरांनी साथीदारांना सविस्तर भाषण दिले, ज्यामध्ये मुस्लिमांनी धर्माचे पालन कसे करावे याबद्दल संपूर्ण कृतीची योजना आखली. या युद्धात बनू तहामाहची टोळी आणि बनू किनानाची टोळी कुरैश आणि काफिरांमध्येही सामील झाले. सैन्याची संख्या तीन हजारांवर पोहोचली. काफिरांची संपूर्ण फौज सशस्त्र होती.

हुजूर अनवर म्हणाले की, या युद्धाची तपशील पुढील प्रवचान सांगितली जाईल, इन्शाल्लाह.

या नंतर हुजूर अन्वर म्हणाले: मी पॅलेस्टिनींसाठी प्रार्थना करण्याबद्दल सांगत आलो. गेल्या काही दिवसांत युद्धबंदी संपल्यानंतर जसं वाटलं होतं तसंच घडत आहे आणि आता इस्रायली सरकार गाझामधील प्रत्येक भागावर पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने बॉम्बफेक आणि हल्ले करत आहे, त्यानंतर निष्पाप मुले आणि नागरिक शहीद होत आहेत. हे थांबवण्यासाठी अमेरिकेने आपली भूमिका पार पाडली पाहिजे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्षही आता दडपलेल्या शब्दात वक्तव्य करत आहेत की, ही गोळीबार थांबली पाहिजे, जी उत्तर आणि दक्षिणेत सारखीच चालू आहे. पूर्वी ते म्हणायचे उत्तरेला कूच करा, काही होणार नाही, आता तिथेही तीच स्थिती आहे.

तथापि, अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे हे शब्द कोणत्याही मानवी सहानुभूतीमुळे नाहीत, कोणीही गैरसमजात राहू नये, ते त्यांच्या स्वतः च्या हितासाठी आहेत, हे सर्व वोट मिळविण्यासाठी करत आहेत. त्यांना पॅलेस्टिनी किंवा मुस्लिमांबद्दल सहानुभूती नाही.

मग मुस्लीम देश आहेत त्यांच्या आवाजात थोडी ताकद दिसत आहे, पण जोपर्यंत ते एकत्र येत नाही आणि युद्ध थांबवण्याचा प्रयत्न करत नाही तोपर्यंत काही उपयोग नाही. अल्लाह मुस्लिमांमध्ये एकता निर्माण करो. मुस्लिमेतर जगाला माहित आहे की त्यांच्यात एकता नाही, तर मुस्लिमच मुस्लिमांना मारत आहेत. पहा यमनमध्ये काय काय होत आहे. तसेच इतर देशांमध्येही असेच घडत आहे. मुसलमानांच्या हातून हजारो मुले आणि निष्पाप मरत आहेत, हे सर्व पाहून दुसऱ्यांना हिम्मत होत आहे की त्यांच्यावर अत्याचार झाले तरी काही फरक पडत नाही, ते स्वतःवर अत्याचार करत आहेत. जेव्हा मुस्लिमांना मुस्लिमांच्या जीवाची पर्वा नाही, तर शत्रूला कशाला पर्वा असेल? सर्वशक्तिमान अल्लाहने पवित्र कुरआनमध्ये अत्यंत कडक ताकीद दिली आहे की, मुस्लिमांना मुसलमानाला मारण्याचा जो दंड सांगण्यात आला आहे, तो हाच की तो नक्कीच नरकात जातील. अल्लाह मुस्लिमांना एकजूट बनवो आणि अत्याचार संपविण्याचे साधन बनू शकेल आणि ते वाढवू नये.

यु.एन आवाज उठवण्याचा प्रयत्न करत आहे पण त्यांचा ऐकत कोण आहे? ते म्हणतात की आम्ही हे करू, ते करू, परंतु ते काहीही करू शकत नाहीत. त्यांचे ऐकणारे कोणी नाही. मोठ्या शक्ती त्यांच्या अधिकाराचा वापर करतात. अल्लाह मुस्लिमांवर दया करो. तथापि, मी जमातच्या माध्यमातून आधीच संदेश दिला आहे की, हे क्रौर्य थांबवण्यासाठी आणि संपवायचे असेल तर प्रार्थनासोबत आपण आपल्या मित्रमंडळाकडे आणि आपल्या पक्षांच्या राजकारण्यांनी आवाज उठवण्यासाठी सतत लक्ष दिले पाहिजे.

सरतेशेवटी, हुजूर अन्वर यांनी मा. मकरमा मसूदा बेगम साहिबा पत्नी मौलाना अब्दुल हकीम अकमल साहिब, आणि मास्टर अब्दुल मजीद साहिब वकीफ यांचे वैशिष्ट सांगतले आणि त्यांची नमाज ए जनाजा ची घोषणा केली.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ
یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ
اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ
وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔